# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३**

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## कपात सूचनांची एकूण संख्या - ४१

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: ई-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०२, सर्वसाधारण शिक्षण**<br>**रूपये:- ७,०३,०२,९८,७१,०००/-**<br>**श्रीमती सुलभा खोडके** |
| (१) | ५१३२ | १० | राज्यात खाजगी माध्यमिक शाळा मधील शिक्षकांची पदभरती मागील अनेक वर्षापासून बंद आहेत याबाबत राज्य शिक्षक संघ यांनी दि. १६ सप्टेंबर २०२२ रोजी मा. शिक्षणाधिकारी, अमरावती यांच्याकडे निवेदन दिलेले असणे, अमरावती जिल्ह्यात शिक्षक भरती प्रक्रिया सुरू करण्याबाबत करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. शिरीष चौधरी** |
| (२) | ५०४५ | १० | जनता शिक्षण मंडळ, खिरोदा ता. रावेर जि. जळगांव या संस्थेच्या शाळेस व तुकड्यांना घोषित मान्यता देण्या बाबतचा प्रस्ताव शालेय शिक्षण विभागाकडे प्रलंबित असणे, उत्तुंग भारत प्राथमिक विद्यामंदीर खिरोदा ता. रावेर ही शाळा मान्यता प्राप्तविनाअनुदानित सन २००३-०४ पासून इ. १ ली ते ४ थी व सन २००७-०८ पासून इ. ५वी ते ७ वी पर्यंत विनाअनुदानित तत्त्वावर मंजुरी मिळालेली असून ती सध्या अघोषितयादीत असून त्यांना घोषित यादीत मंजूरी देण्याची आवश्यकता असणे, धनाजी नाना विद्यालय, खिरोदा ता. रावेर या अनुदानित विद्यालयाचे सन २०१२-१३ मध्येझालेल्या पटपडताळीनुसार शासन निर्णय क्र. माशातु-२०१२/(९०/१२) माशिक १ दि. १६ऑगस्ट २०१२ नुसार नैसर्गिक वाढीच्या व अतिरीक्त तुकड्या इ. ५ वी च्या २ तुकड्या,इ. ६ वी ची १ तुकडी, इ. ७ वी ची १ तुकडी, इ. ८ वी ची १ तुकडी अशा एकूण ५तुकड्या मंजूर केलेल्या असणे, तसेच शासन निर्णय माशातु २०१२ / (९०/१२) माशि दि. ३ सप्टेंबर २०१३ नुसार नैसर्गिक वाढीच्या व अतिरीक्त तुकड्या इ. ९ वी ची १ तुकडी अशा एकूण ६ तुकड्यामंजुर असून त्या अघोषित यादीत असल्याने दोन्ही शाळांना घोषित यादीत समाविष्ट करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (३) | ५०८५ | १० | पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्या बहुतांश भाग हा डोंगरी व दुर्गम असल्याने येथे गावातील वाड्यावस्तांकरीता कोणतेही वाहतुकीच्या सुविधा व रस्ते उपलब्ध जिल्हा परिषद मार्फत चालु असणाऱ्या युडास २०२१ - २०२२ नुसार ० ते २० विद्यार्थी पट संख्या असणाऱ्या शाळा बंद करण्याबाबत शासन निर्णय |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | दि.२४/०९/२०२२ रोजी निर्गमित केलेला असणे,यामुळे शेकडो शाळा बंद होऊन हजारो शिक्षक अतिरिक्त व अंदाजे ३ लाख विद्यार्थी वाड्या-वस्त्यावरील शिक्षणारी लहान मुले विशेषतः मुली शिक्षणापासून वंचित राहणार असणे,शिक्षण हक्क कायद्यानुसार ४ थी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना १ ते ४ किमी पर्यंत शाळा उपलब्ध करून देण्याचे शासन निर्णय उपलब्ध असताना शाळा बंद केल्यास ग्रामीण, आदिवासी, डोंगरी - दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना १० ते १५ किमी अंतर पार करावे लागणार असणे, त्यामुळे पटसंख्येच्या नावाखाली कोणतीही शाळा बंद न करू नये यासाठी करावयाची कार्यवाही व करावयाची उपाययोजना. |
| (४) | ५०८७ | १० | दि. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी सेवेत कायमस्वरूपी रुजू असणाऱ्या विनाअनुदान, अंशतः अनुदानावर असलेल्या एक नोव्हेंबर २००५ नंतर शंभर टक्के अनुदानावर आलेल्या मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन मिळावी यासाठी निवेदन सविनय सादर करून मागणी करण्यात येणे, एक नोव्हेंबर २००५ पूर्वी मा. शिक्षणाधिकारी यांची मान्यता नियुक्ती पत्र असलेले व टप्पा अनुदानात असलेले व २००५ नंतर शंभर टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक बांधवांना महाराष्ट्र नागरी सेवा अधिनियम १९८२ अंतर्गत जुनी पेन्शन योजना सरकारने पूर्ववत लागू करण्याची आवश्यकता व याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (५) | ५१२९ | १० | राज्यातील अनुसूचीत जमाती क्षेत्रातील १३ जिल्ह्यात जिल्हा परिषद शाळांमधील वर्षोनुवर्षे भरती न केल्यामुळे शिक्षकांची ७ हजार १८७ पदे रिक्त असणे अमरावती जिल्ह्यातील आदिवासी बहुल भागातील मराठी माध्यमांचे १६५ आणि उर्दू माध्यमांचे एकूण १४ पदे रिक्त असणे, आदिवासी पेसा क्षेत्रातील शिक्षकांची ७ हजार १८७ रिक्त पदे नितांत आवशक्यता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | ५१३१ | १० | प्राथमिक शाळेत शिकत असलेल्या मुलींच्या गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी तसेच त्यांच्या उपस्थितीचे प्रमाण वाढवण्यासाठी पहिली ते चौथीपर्यंतच्या जि.प. प्राथमिक शाळा , आश्रमशाळेतील अनुसूचित जाती , अनुसूचित जमाती , भटक्या व विमुक्त जाती तसेच दारिद्र्यरेषेखालील मुलींसाठी प्रति दिन एक रुपया भत्ता दिला जात असून सन २०२०-२१ पासून या भत्याचे वितरण झालेले नसणे , शिक्षण विभाग अमरावती मार्फत या दैनंदिन भत्याचे वाटप करण्याकरिता शासनाकडे २५ लक्ष रुपयांची मागणी केलेली असणे, परंतु अद्यापही निधीची उपलब्धता झालेली नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. चेतन तुपे** |
| (७) | ५११२ | १० | राज्यातील महानगरपालिकांमध्ये विशेषतः पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट लगतच्या ग्रामीण भागातील प्राथमिक शाळांच्या इमारती मोकळया जागा इत्यादी मालमत्तांचे आणि कर्मचाऱ्यांचे हस्तांतरण महापालिकेकडे तातडीने होत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | नसल्याने शाळा इमारतींची सुरक्षा आणि देखभाल तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन आणि पदोन्नती इत्यादी बाबत निर्माण झालेल्या समस्या, परिणामी कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेली अनिश्चिततेची भावना, या संदर्भात सर्वंकष धोरण निश्चित करण्याबाबत तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता. |
| (८) | ५१२१ | १० | शासनाच्या शिक्षण हक्क धोरणानुसार(RTE)खाजगी शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क आणि तत्सम अनुषंगिक देय रकमांची परिपूर्तता तातडीने करून निश्चित मुदतीत या रकमा संबंधीत शिक्षण संस्थांना अदा करण्याची आवश्यकता,शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (९) | ५०३१ | १० | भंडारा जिल्ह्यातील साकोली तालुक्यातील जिल्हा परिषद, शाळेतील वर्गखोल्यांचा अभाव असणे, बऱ्याच वर्गखोल्या नादुरूस्त असल्यामुळे विद्यार्थ्यांना धोका असणे, विद्यार्थ्यांना पिण्याच्या शुद्ध पाण्याची सोय नसणे, शालेय परिसरातील सौंदर्यीकरणाचा अभाव असणे, तालुक्यातील शाळांमध्ये संगणक मुबलक प्रमाणात नसल्यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक अभ्यासक्रम शिकवण्यास अडचण निर्माण होणे, तालुक्यातील गटसाधन केंद्रांमध्ये सुविधांचा अभाव असणे, तालुक्यातील गट साधान केंद्रांच्या ईमारती नादुरूस्त असणे. त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया. |
| (१०) | ५०३३ | १० | भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुक्यातील जिल्हा परिषद, शाळेतील वर्गखोल्यांचा अभाव असणे, बऱ्याच वर्गखोल्या नादुरूस्त असल्यामुळे विद्यार्थ्यांना धोका असणे, विद्यार्थ्यांना पिण्याच्या शुद्ध पाण्याची सोय नसणे, शालेय परिसरातील सौंदर्यीकरणाचा अभाव असणे, तालुक्यातील शाळांमध्ये संगणक मुबलक प्रमाणात नसल्यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक अभ्यासक्रम शिकवण्यास अडचण निर्माण होणे, तालुक्यातील गटसाधन केंद्रांमध्ये सुविधांचा अभाव असणे, तालुक्यातील गट साधान केंद्रांच्या ईमारती नादुरूस्त असणे. त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया. |
| (११) | ५०३४ | १० | भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर तालुक्यातील जिल्हा परिषद, शाळेतील वर्गखोल्यांचा अभाव असणे, बऱ्याच वर्गखोल्या नादुरूस्त असल्यामुळे विद्यार्थ्यांना धोका असणे, विद्यार्थ्यांना पिण्याच्या शुद्ध पाण्याची सोय नसणे, शालेय परिसरातील सौंदर्यीकरणाचा अभाव असणे, तालुक्यातील शाळांमध्ये संगणक मुबलक प्रमाणात नसल्यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक अभ्यासक्रम शिकवण्यास अडचण निर्माण होणे, तालुक्यातील गटसाधन केंद्रांमध्ये सुविधांचा अभाव असणे, तालुक्यातील गट साधान केंद्रांच्या ईमारती नादुरूस्त असणे. त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (१२) | ५०१७ | १० | ठाणे जिल्ह्यामध्ये चार हजारांवर मुले शाळाबाह्य असल्याचे आरोग्य विभागाने केलेल्या सर्वेक्षणामधून माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये निदर्शनास येणे, ग्रामीण, शहरी आणि मनपा विभागातील शून्य ते १८ वर्षे वयोगटातील बालकांची आरोग्य तपासणी करून आवश्यकतेनुसार उपचार तथा शस्त्रक्रिया करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत 'जागरूक पालक, सुदृढ बालक' अभियान राबविण्यात येत असणे, या अभियानांतर्गत जिल्हा स्तरावर केलेल्या सूक्ष्म कृती आराखड्यात ग्रामीण भागात ६ ते १८ या वयोगटात ४ हजार २६९ बालके ही शाळाबाह्य असल्याची बाब समोर आली असणे, जिल्ह्याच्या शिक्षण विभागाने जून महिन्यात केलेल्या सर्वेक्षणानुसार एकही विद्यार्थी शाळाबाह्य नसल्याचे सांगितले असणे, त्यामुळे आरोग्य विभागाने केलेले सर्वेक्षण नेमके कधीचे आहे आणि कोणते सर्वेक्षण खरे आहे असा प्रश्न उभा राहिला असणे, मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यातील ० ते १८ या वयोगटातील बालकांच्या आरोग्य तपासणीला सुरुवात झाली असणे, या अभियानांतर्गत जिल्ह्यातील सर्व शासकीय आणि निमशासकीय शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, आश्रमशाळा, अंध-दिव्यांग शाळा, अंगणवाड्या, बालगृह बालसुधार गृहे, अनाथालये, समाजकल्याण व आदिवासी विभाग वसतिगृहे, खाजगी नर्सरी, बालवाड्या, खासगी शाळा आणि खासगी कनिष्ठ महाविद्यालये तसेच शाळाबाह्य अशा ० ते १८ वर्षापर्यंतच्या मुला-मुलींची आरोग्य तपासणी होणार असणे, या तपासणी दरम्यान आजारी आढळलेल्या बालकांवर त्वरित उपचार आणि संदर्भ सेवा पुरविण्यात येणार असणे,जागरूक पालक, सुदृढ बालक अभियानांतर्गत ठाणे जिल्ह्यातील पाच तालुक्यातील ० ते १८ या वयोगटातील जवळपास ४ लाख ९३ हजार ८३४ बालकांची तपासणी केली जाणार असणे, त्यामध्ये १ लाख ५५ हजार ७०० बालक हे ० ते सहा वयोगटातील असून उर्वरित ३ लाख ३८ हजार १३४ बालक हे सहा ते १८ वयोगटातील असणे,शालेय शिक्षण विभागाकडून केल्या जाणाऱ्या सर्व्हे मध्ये मात्र शाळाबाह्य मुलांची आकडेवारी लपविण्यात येत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१३) | ५०१५ | १० | काही ठिकाणी विघार्थीनीवर काही शिक्षकाकडून होत असलेले विनयभंगाच्या घटना, अत्याचाराच्या घटना निर्देशनास येणे, त्यामुळे राज्यातील विघार्थीनीसह पालकामध्ये आपली मुलगी शाळेत सुरक्षीत नसल्याची भावना निर्माण होणे, काही ठिकाणी तक्रार दाखल होणे तर काही ठिकाणी तक्रार दाखल करण्यात न येणे, याबाबत नाममात्र चौकशी होऊन कार्यवाही पाहीजे त्या प्रमाणात होत नसल्याने अशा घटनामध्ये दिवसेंदिवस वाढ होणे, त्यामुळे राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विघार्थी व विघार्थीनीच्या सुरक्षततेच्या दृष्टीने सि.सि.टी.व्ही लावण्याची मागणी करणे, मात्र या अत्यंत महत्वाच्या मागणी कडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे विघार्थ्यांसह पालकात पसरत असलेले तिव्र असंतोष व |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | भितीचे वातावरण परिणामी राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विघार्थी व विघार्थीनीच्या सुरक्षततेच्या दृष्टीने सि.सि.टी.व्ही लावण्याबाबत व त्यास आवश्यक असलेला निधी उपलब्ध होण्यासाठी राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (१४) | ५०५४ | १० | प्राथमिक शाळेत शिकत असलेल्या मुलींच्या गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी तसेच त्यांच्या उपस्थितीचे प्रमाण वाढवण्यासाठी पहिली ते चौथीपर्यंतच्या जि.प. प्राथमिक शाळा , आश्रमशाळेतील अनुसूचित जाती , अनुसूचित जमाती , भटक्या व विमुक्त जाती तसेच दारिद्र्यरेषेखालील मुलींसाठी प्रति दिन एक रुपया भत्ता दिला जात असून सन २०२०-२१ पासून या भत्याचे वितरण झालेले नसणे , शिक्षण विभाग अमरावती मार्फत या दैनंदिन भत्याचे वाटप करण्याकरिता शासनाकडे २५ लक्ष रुपयांची मागणी केलेली असणे, परंतु अद्यापही निधीची उपलब्धता झालेली नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१५) | ५०७४ | १० | राज्यातील अनुसूचीत जमाती क्षेत्रातील १३ जिल्ह्यात जिल्हा परिषद शाळांमधील वर्षोनुवर्षे भरती न केल्यामुळे शिक्षकांची ७ हजार १८७ पदे रिक्त असणे अमरावती जिल्ह्यातील आदिवासी बहुल भागातील मराठी माध्यमांचे १६५ आणि उर्दू माध्यमांचे एकूण १४ पदे रिक्त असणे , आदिवासी पेसा क्षेत्रातील शिक्षकांची ७ हजार १८७ रिक्त पदे नितांत आवशक्यता असणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१६) | ५१४८ | १० | दर्यापूर मंतदारसाघ हा ग्रामीण भागात विभागला असून दर्यापूर, अंजनगाव सुर्जी , अचलपूर या तालुक्यातील जिल्हा परिषदच्या अखत्यारीत येणाऱ्या शाळांमध्ये विद्यार्थी पटसंख्या अतिशय चांगली असणे, येथील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी आदर्श शाळा विकसित होणे अत्यंत आवश्यक असणे, तसेच या भागातील शिक्षक तसेच विद्यार्थ्यांच्या पालकांची आदर्श शाळा निर्माण करणेबाबत मागणी असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१७) | ५००५ | १० | मुंबई उपनगरातील व राज्यातील अनुदानीत संस्थेतील मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना पेन्शन योजना दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पासून लागु केली असणे, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पासूनच्या कर्मचा-यांना अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम, शालेय शिक्षण विभाग यांनी मंजुर केली नसणे, परिणामी मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, अर्जित रजा रोखीकरण करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१८) | ५०३२ | १० | सेंट्रल इंग्लिश स्कूल, सावंतवाडी, जि.सिंधुदूर्ग या शाळेत मोठया प्रमाणावर फी वाढ केली असणे, विद्यार्थ्यांची फी कमी करण्याची आवश्यकता असणे, गरीब विद्यार्थ्यांना फी भरण्यास अडचणी निर्माण होत असणे, इंग्लिश शाळेत मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार व गैरव्यवहार झाला असणे, परिणामी विद्यार्थी व पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असणे, फी वाढी विरोधात पालक व विद्यार्थ्यांनी मार्चे, उपोषण केले असणे, तसेच अनागोंदी कारभारामुळे स्थानिक नागरीक त्रस्त झाले असणे, या सर्व बाबी गांभीर्याने घेऊन शालेय समिती बरखास्त करुन त्याठिकाणी प्रशासकाची नेमणूक करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरीकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावययाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| | | | **श्री. विक्रमसिंह सावंत** |
| (१९) | ५१४१ | १० | सांगली जिल्हयातील जत तालुक्यातील अनेक शिक्षण संस्थाच्या शाळांना विविध विकास कामांसाठी कर्नाटक राज्याकडून निधी प्राप्त झाला असुन त्याच कामांसाठी राज्यशासनाकडुनही निधी देण्यात येणे, ही बाब शासनाच्या निदर्शनास येणे, त्यामुळे आमजनतेत पसरलेली नाराजीची भावना याबाबत राजयशासनाने तातडीने चौकशी करुन या शिक्षण संस्थावर करावयाची कार्यवाही व करावयाची उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: ई-३** |
| | | | **मुख्य लेखाशीर्ष: २२०४, क्रीडा व युवक सेवा** |
| | | | **रूपये:- ६,४०,४९,९१,०००/-** |
| | | | **श्री. चेतन तुपे** |
| (२०) | ५१२३ | १० | राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरचे खेळाडू घडवण्यासाठी क्रीडा प्रकारांना उत्तेजन देण्याच्या दृष्टीने राज्यातील प्रत्येक तालुका मुख्यालयाच्या गावा/शहरांमध्ये सुसज्ज क्रीडा संकुले उभारण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२१) | ५१२५ | १० | विविध क्रीडा प्रकारांना उत्तेजन देऊन दर्जेदार खेळाडू घडवण्यासाठी शैक्षणिक अवस्थेपासूनच शाळा आणि विद्यालय पातळीवर क्रीडा शिष्यवृत्ती सुरू करण्याबाबत सर्वकष धोरण आखून तातडीने अमलात आणण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अनिल पाटील** |
| (२२) | ५०५१ | १०० | जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथील क्रीडा संकुलाचे काम गेल्या 10 वर्षांपासून प्रलंबित असणे, क्रीडा संकुलासाठी एक कोटी रुपयांचे अनुदान प्राप्त असतानाही पूर्वीच्या कंत्राटदाराने केलेल्या अनेक चुकांमुळे क्रीडा संकुलाची दुरावस्था झालेली असणे, सार्वजनिक बांधकाम विभागाने कंत्राट दराचे बिल अदा न केल्यामुळे कंत्राटदार सदरील क्रीडा संकुलाचा ताबा देत नसणे, प्राप्त अनुदानातून क्रीडा संकुलाचे बिल अदा करून क्रीडा विभागाने क्रीडा संकुलाचा ताबा घेणे आवश्यक असणे, सध्यपरिस्थितीत क्रीडा संकुल अद्ययावत करण्यासाठी ट्रॅक दुरुस्तीसाठी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | अंदाजित 5 कोटी रुपयांची गरज असणे, सदर क्रीडा संकुल पूर्ण झाल्यास जळगाव जिल्ह्यातील ग्रामीण भागातील खेळाडूंना वाव मिळणार असणे त्यामुळे सदरील क्रीडा संकुलास निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (२३) | ५०२४ | १० | येवला (जि.नाशिक) तालुका क्रीडा संकुलासाठी पूर्वी १०० लक्ष च्या मर्यादेत खर्च झालेला असणे, राज्य क्रीडा धोरणाअंतर्गत क्रीडा संकुलांच्या अनुदान मर्यादेत सुधारणा करण्यात येवून तालुका क्रीडा संकुलासाठी १०० लक्ष ऐवजी ५०० लक्ष ही सुधारित अनुदान मर्यादा विहित करण्यात आलेली असणे, नवीन क्रीडा धोरणानुसार या क्रीडा संकुलाच्या रु.५१६.६४ लक्ष अंदाजपत्रकाला दि. १८ ऑगस्ट २०२२ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असणे, या कामासाठी निधी उपलब्ध करून न दिल्यामुळे सदर कामाची निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली असणे, तालुका क्रीडा संकुल येवला, जि. नाशिक या कामाची निविदा प्रक्रिया राबवून हे काम सुरु करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपयायोजना. |
| | | | **श्री. धनंजय मुंडे** |
| (२४) | ५०३७ | १०० | बीड जिल्ह्यातील पाटोदा येथे राज्य सरकारच्या 1996 च्या क्रीडा धोरणानुसार तालुक्याचे ठिकाण असल्याने व लोकसंख्या, क्रीडा प्रेमींची संख्या, कुस्ती खेळणाऱ्या खेळाडूंची संख्या व मागणी पाहता येथे सर्व सुविधा युक्त क्रीडा संकुल उभारणीची नितांत गरज असणे व त्यामुळे सर्व सुविधा युक्त क्रीडा संकुल उभारणीची नितांत गरज असणे, सदर क्रीडा संकुल उभारणीसाठी जागा उपलब्ध करून सर्व सुविधायुक्त क्रीडा संकुल उभारणीसाठी 12 कोटी रुपये निधीची असलेली आवश्यकता, त्याबाबत लोकप्रतिनिधी, स्थानिक नागरिक, खेळाडू यांकडून सातत्याने होत असलेली मागणी, त्यावर करावयाची तातडीची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया. |
| (२५) | ५०३८ | १०० | बीड जिल्ह्यातील शिरूर कासार येथे राज्य सरकारच्या 1996 च्या क्रीडा धोरणानुसार तालुक्याचे ठिकाण असल्याने व लोकसंख्या, क्रीडा प्रेमींची संख्या, कुस्ती खेळणाऱ्या खेळाडूंची संख्या व मागणी पाहता येथे सर्व सुविधा युक्त क्रीडा संकुल उभारणीची नितांत गरज असणे व त्यामुळे सर्व सुविधा युक्त क्रीडा संकुल उभारणीची नितांत गरज असणे, जिल्हा प्रशासनाने क्रीडा संकुल उभारणीसाठी जागेचे सर्वेक्षण केलेले असणे, सदर क्रीडा संकुल उभारणीसाठी जागा उपलब्ध करून सर्व सुविधायुक्त क्रीडा संकुल उभारणीसाठी 12 कोटी रुपये निधीची असलेली आवश्यकता, त्याबाबत लोकप्रतिनिधी, स्थानिक नागरिक, खेळाडू यांकडून सातत्याने होत असलेली मागणी, त्यावर करावयाची तातडीची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२६) | ५०४० | १०० | बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथे राज्य सरकारच्या 1996 च्या क्रीडा धोरणानुसार तालुक्याचे ठिकाण असल्याने व लोकसंख्या, क्रीडा प्रेमींची संख्या व मागणी पाहता येथे सर्व सुविधा युक्त क्रीडा संकुल उभारणीची नितांत गरज असणे, अंबाजोगाई शहरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय यांसह शिक्षण संस्थांचे मोठे जाळे असून बाहेरून शिकायला येणाऱ्या नव तरुणांची संख्या अधिक असणे व त्यामुळे सर्व सुविधा युक्त क्रीडा संकुल उभारणीची नितांत गरज असणे, जिल्हा प्रशासनाने क्रीडा संकुल उभारणीसाठी जागेचे सर्वेक्षण केलेले असणे, सदर क्रीडा संकुल उभारणीसाठी जागा उपलब्ध करून सर्व सुविधायुक्त क्रीडा संकुल उभारणीसाठी 15 कोटी रुपये निधीची असलेली आवश्यकता, त्याबाबत लोकप्रतिनिधी, स्थानिक नागरिक, खेळाडू यांकडून सातत्याने होत असलेली मागणी, त्यावर करावयाची तातडीची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया. |
| (२७) | ५०४१ | १०० | बीड जिल्ह्यातील परळी वैद्यनाथ येथे राज्य सरकारच्या 1996 च्या क्रीडा धोरणानुसार तालुक्याचे ठिकाण असल्याने व लोकसंख्या, क्रीडा प्रेमींची संख्या व मागणी पाहता येथे सर्व सुविधा युक्त क्रीडा संकुल उभारणीची नितांत गरज असणे, जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड यांनी याबाबत दि. 24 जून, 2022 रोजी राज्य शासनाकडे जागेसहित निधी मागणीचा प्रस्ताव सादर केलेला असणे, परळी वैद्यनाथ शहरात जागा उपलब्ध करून सर्व सुविधायुक्त क्रीडा संकुल उभारणीसाठी 15 कोटी रुपये निधी असलेली आवश्यकता, त्याबाबत लोकप्रतिनिधी, स्थानिक नागरिक, खेळाडू यांकडून सातत्याने होत असलेली मागणी, त्यावर करावयाची तातडीची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (२८) | ५००८ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी तालुका क्रिडा संकुलात विविध प्रकारचे खेळ खेळण्यासाठी व सराव करण्यासाठी क्रिडा संकूलनाचा उपयोग करण्यात येणे, मात्र या ठिकाणी आवश्यक त्या सोईसुविधा नसल्यामुळे जिल्हा क्रिडा अधिकारी चंद्रपूर यांनी याबाबतचा रितसर प्रस्ताव सादर करणे, यासर्व सोईसुविधा उपलब्ध होण्यासाठी व जिल्हा क्रिडाधिकारी चंद्रपूर यांनी पाठविलेल्या प्रस्तावाच्या अनुशंगाने किमान १५ कोटी रुपयांच्या निधीची मागणी करणे, मात्र निधी अभावी सदर कामे करता येत नसल्यामूळे खेळाडू व नागरिकात पसरत असलेला तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी ब्रम्हपूरी येथील तालुका क्रिडा संकूलात विविध सोईसुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने जिल्हा क्रिडा अधिकारी चंद्रपूर यांनी पाठविलेल्या प्रस्तावानुसार किमान १५ कोटी रुपयाचा निधी उपलब्ध होण्यासाठी राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (२९) | ५००९ | १० | चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही तालुका क्रिडा संकुलात विविध प्रकारचे खेळ खेळण्यासाठी व सराव करण्यासाठी क्रिडा संकूलनाचा उपयोग करण्यात येणे, मात्र या ठिकाणी आवश्यक त्या सोईसुविधा नसल्यामुळे जिल्हा क्रिडा अधिकारी चंद्रपूर यांनी याबाबतचा रितसर प्रस्ताव सादर करणे, यासर्व सोईसुविधा उपलब्ध |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | होण्यासाठी व जिल्हा क्रिडाधिकारी चंद्रपूर यांनी पाठविलेल्या प्रस्तावाच्या अनुशंगाने किमान १५ कोटी रुपयांच्या निधीची मागणी करणे, मात्र निधी अभावी सदर कामे करता येत नसल्यामूळे खेळाडू व नागरिकात पसरत असलेला तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी सिंदेवाही येथील तालुका क्रिडा संकूलात विविध सोईसुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने जिल्हा क्रिडा अधिकारी चंद्रपूर यांनी पाठविलेल्या प्रस्तावानुसार किमान १५ कोटी रुपयाचा निधी उपलब्ध होण्यासाठी राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (३०) | ५०१० | १० | चंद्रपूर जिल्हयातील सावली तालुका क्रिडा संकुलात विविध प्रकारचे खेळ खेळण्यासाठी व सराव करण्यासाठी सावली येथे क्रिडा संकुलाचे अद्यापही बाधंकाम झालेले नसणे, सदर क्रिडा संकूलाचे बांधकाम करणे व या ठिकाणी आवश्यक त्या सोईसुविधा उपलब्ध होण्यासाठी जिल्हा क्रिडा अधिकारी चंद्रपूर यांनी याबाबतचा रितसर प्रस्ताव सादर करणे, यासर्व सोईसुविधा उपलब्ध होण्यासाठी व जिल्हा क्रिडाधिकारी चंद्रपूर यांनी पाठविलेल्या प्रस्तावाच्या अनुशंगाने किमान १५ कोटी रुपयांच्या निधीची मागणी करणे, मात्र निधी अभावी सदर कामे करता येत नसल्यामूळे खेळाडू व नागरिकात पसरत असलेला तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी सावली येथील तालुका क्रिडा संकूलाचे बांधकाम करणे व विविध सोईसुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने जिल्हा क्रिडा अधिकारी चंद्रपूर यांनी पाठविलेल्या प्रस्तावानुसार किमान १५ कोटी रुपयाचा निधी उपलब्ध होण्यासाठी राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (३१) | ५०११ | १० | चंद्रपूर जिल्हातील ब्रम्हपूरी तालुका हे शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखल्या जात असणे, या तालुक्यातील विघार्थी आणि विघार्थ्यींनी खो-खो, व्हॉलिबॉल, कराटे यासह विविध खेळामध्ये देश पातळीवर भाग घेऊन अनेक पुरस्कार मिळविलेले असणे, असे असतांना ही विघार्थ्यांना शाळेत पाहिजे त्या प्रमाणात व आवश्यक असलेल्या सुविधा मिळत नसणे, याकारणास्तव विघार्थ्यांसह पालकांनी तालुक्यातील प्रत्येक शाळेत सर्व सुविधायुक्त क्रीडा मैदानाची मागणी करीत असतांना सुध्दा याकडे प्रशासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे त्यांच्यात पसरत असलेले तिव्र असंतोष परिणामी चंद्रपूर जिल्हातील ब्रम्हपूरी तालुक्यातील प्रत्येक प्राथमिक, माध्यमिक शाळेत सर्व सुविधायुक्त क्रीडा मैदान तयार करण्यासाठी व त्यास आवश्यक असलेला निधी उपलब्ध होण्यासाठी राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (३२) | ५०१२ | १० | चंद्रपूर जिल्हातील सिंदेवाही व सावली तालुका या तालुक्यातील विघार्थी आणि विघार्थ्यींनी खो-खो, व्हॉलिबॉल, कराटे यासह विविध खेळामध्ये राज्य पातळीवर भाग घेऊन अनेक पुरस्कार मिळविलेले असणे, असे असतांना ही विघार्थ्यांना शाळेत पाहिजे त्या प्रमाणात व आवश्यक असलेल्या सुविधा मिळत नसणे, याकारणास्तव विघार्थ्यांसह पालकांनी तालुक्यातील प्रत्येक शाळेत सर्व सुविधायुक्त |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | क्रीडा मैदानाची मागणी करीत असतांना सुध्दा याकडे प्रशासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे त्यांच्यात पसरत असलेले तिव्र असंतोष परिणामी चंद्रपूर जिल्हातील सिंदेवाही व सावली तालुक्यातील प्रत्येक प्राथमिक, माध्यमिक शाळेत सर्व सुविधायुक्त क्रीडा मैदान तयार करण्यासाठी व त्यास आवश्यक असलेला निधी उपलब्ध होण्यासाठी राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (३३) | ५०१३ | १० | चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयासह राज्यातील युवक व युवती हे स्वत:च्या, परिवाराच्या व नागरिकांच्या रक्षणासाठी कराटेचे (ज्युडे) प्रशिक्षण घेणे, प्रशिक्षण पुर्ण होताच विदर्भ, राज्य, देश व विदेशात सुध्दा कराटेचे (ज्युडे) खेळाण्यासाठी जात असणे, या कराटेनेचे (ज्युडे) मध्ये अनेक खेळांडूना पुरस्कार सुध्दा मिळालेले असणे, मात्र या खेळाला राज्य शासनाच्या क्रीडा विभागाकडून मान्यताच नसल्याने हजारो खेळाडूनां अनेक सोईसवलतीपासून वंचित राहावे लागत असल्याची धक्कादायक माहिती निर्देशनास येणे, त्यामुळे खेळाडूसह पालकांनी कराटेचे (ज्युडे) या खेळास ईतर खेळा प्रमाणे मान्यता देऊन खेळाडूंना सोईसवलती लागू करणे, शासकीय नौकरीत आरक्षण मिळणे अशी मागणी करणे, मात्र याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे नागरिकात पसरत असलेले तिव्र असंतोष व भितीचे वातावरण परिणामी कराटेचे (ज्युडे) या खेळास ईतर खेळा प्रमाणे मान्यता देऊन खेळाडूंना सोईसवलती लागू करणे, शासकीय नौकरीत आरक्षण मिळणे याबाबत राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (३४) | ५०१४ | १० | चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील प्रत्येक तालुक्यात क्रीडा संकूल असणे, जिल्हास्तरावर जिल्हा क्रीडा संकूल असणे, या सर्व क्रीडा संकूलनात हजारो खेळाडू विविध खेळ खेळण्यासाठी जात असणे, मात्र अनेक क्रीडा संकूलनात तालुका क्रीडा अधिकारी नसणे, तर जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याची सुध्दा जागा रिक्त असणे, त्यामुळे या क्रीडा संकूलनातील कारभार प्रभारी अधिकाऱ्यांच्या हाती देण्यात आलेले असल्याने खेळाडूनां योग्य प्रशिक्षण मिळत नसणे, तसेच क्रीडा संकूलाच्या विकासकामाकडे सुध्दा दुर्लक्ष होणे, त्यामुळे दोन्ही जिल्हयातील तालुका क्रीडा अधिकारी व जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या रिक्त जागा त्वरीत भरण्यात यावे अशी मागणी नागरिकांनी वारंवार करणे मात्र या मागणी कडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे नागरिकांत पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील रिक्त असलेल्या सर्व क्रीडा अधिकाऱ्यांच्या जागा त्वरीत भरण्याबाबत राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (३५) | ५१४५ | १० | दर्यापूर विधानसभा मतदारसंघांत मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू निर्माण होत असणे , दर्यापूर शहराक मध्यभागी तालुका क्रीडा संकुल असणे , येथे ग्रामीण भागातील विविध खेळाडू विविध प्रकारचे खेळ खेळण्यास येत असणे , परंतु या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | ठिकाणी जलतरण तलाव नसल्याने खेळाडूंची गैरसोय होत असणे , तालुका क्रीडा संकुल दर्यापूर येथे जलतरण तलाव बांधकाम करण्यासाठी तालुक्यातील खेळाडूंची मागणी असणे , तालुका क्रीडा संकुल दर्यापूर येथे जलतरण तलाव निर्माण करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: ई-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२५१, सचिवालयीन- सामाजिक सेवा**<br>**रूपये:- २२,३२,८६,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (३६) | ५०५७ | १० | राज्यातील शैक्षणिक, सामाजिक व राष्ट्रीय क्षेत्रात प्रशंसात्मक कार्य गौरवार्थ शिक्षकांना त्यांच्या अंगीकृत कामात व त्यांच्या गुणांचा यथोचित सन्मान करण्याच्या उद्देशाने शालेय शिक्षण विभागांतर्गत ‘आदर्श शिक्षक पुरस्कार’ जाहीर करण्यात येणे, त्या अनुषगांने दरवर्षी दि. 5 सप्टेंबर, रोजी शिक्षक दिनाच्या खास समारंभात शिक्षकांना पुरस्कार प्राप्त करण्यात येऊन त्यांना एक आगाऊ वेतनवाढ दिली जात असणे, या संदर्भात दिनांक 4 सप्टेंबर, 2018 च्या शासन निर्णयानंतर शिक्षकांची जिल्हा स्तरावर आदर्श पुरस्काराची वेतनवाढ बंद करण्यात आलेली असणे, सदर बाबतीत जिल्हा स्तरावर आदर्श पुरस्कार प्राप्त पुरस्कार शिक्षकांना मिळणारी वेतनवाढ सन 2018 पासून बंद न करता वेतनवाढ पूर्ववत लागू करणेसाठी महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद पुरस्कार प्राप्त शिक्षक समन्वय समिती जि. बुलडाणा, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (प्राथमिक) जिल्हा शाखा, जि. चंद्रपूर तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे नोव्हेंबर-डिसेंबर 2022 मध्ये पत्राद्वारे मागणी करूनही याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, परिणामी राज्यातील शिक्षकांमध्ये शासनप्रती निर्माण झालेली चिडीची व असंतोषाची भावना, त्यामुळे आदर्श सेवा पुरस्कार शिक्षकांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाने तातडीने आर्थिक निधीची तरतूद करून राज्यातील शैक्षणिक, सामाजिक व राष्ट्रीय क्षेत्रात प्रशंसात्मक कार्य गौरवार्थ शिक्षकांना प्रोत्साहनात्मक मिळणारी पुरस्कार वेतनवाढ पूर्ववत लागू करणेबाबत, धोरणात्मक निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही.’’ |
| | | | **मागणी क्रमांक: ई-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२०२, शक्षिण, क्रीडा, कला व संस्कृती यावरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- ३४,९५,२९,९००/-**<br>**श्री. अजित पवार** |
| (३७) | ५०७६ | १० | “राज्यात गाजलेल्या टीईटी घोटाळ्यानंतर बोगस सीबीएससी शाळा वाटप करणारी टोळी निर्माण झाल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीला येणे, सुमारे 12 लाख रुपयांमध्ये बनावट एनओसी देऊन राज्यभर आशा शाळा सुरू झाल्या असणे, विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे शहरातील तीन शाळांना देण्यात आलेले ना हरकत प्रमाणपत्र बोगस असल्याचे आढळून येणे, यानंतर शिक्षण विभागाने मुंबई सह |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | मोठ्या शहरात बोगस शाळांची शोध मोहीम सुरू केलेली असणे, त्यामध्ये शेकडो शाळा अशा प्रकारच्या बोगस ना हरकत प्रमाणपत्राच्या द्वारे सुरू झाल्याचे निष्पन्न होणे, ज्या शाळांकडे बोगस प्रमाणपत्र आढळून आले त्यांच्यावर फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्याचे आदेश शिक्षण उप संचालक, पुणे यांनी दिलेले असले तरी अद्याप एकही प्रकरणात पुढील कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे राज्यातील विद्यार्थी, पालक आणि नागरिकांमध्ये राज्य शासनाच्या संदर्भात निर्माण झालेली असंतोषाची भावना, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना” |
| (३८) | ५१०३ | १० | ”देशात नवीन शैक्षणिक धोरण आणि त्या माध्यमातून कौशल्य विकास प्रगत शिक्षणाच्या मोठ्या घोषणा केल्या जात असताना देशातील 10 लाख 26 हजार 386 सरकारी शाळांपैकी केवळ अडीच लाख शाळांमध्येच इंटरनेटची सुविधा उपलब्ध असल्याची माहिती उघडकीला आलेली असणे, महाराष्ट्रातही सरकारी शाळांना इंटरनेट सुविधा पुरवण्यासाठी सरकार उदासीन असणे, 65 हजार 639 सरकारी शाळांपैकी केवळ 18540 शाळांमध्ये इंटरनेटची सुविधा राज्यामध्ये असल्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारचे याकडे झालेले दुर्लक्ष, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वउपायोजना.” |
| (३९) | ५१०९ | १० | ”शालेय मुला-मुलींच्या बौद्धिक, शारीरिक, भावनिक आणि सामाजिक विकासासाठी नियोजनपूर्वक दिले जाणारे शिक्षण म्हणजे शारीरिक शिक्षण, हे जरी खरे असले तरी राज्य सरकार शारीरिक शिक्षणाला पाहिजे तितके महत्त्व देत नसल्यामुळे मागील बारा वर्षात शारीरिक शिक्षकांची भरती झालेली नसल्याची बाब उघडकीला येणे, शारीरिक शिक्षणामुळे निर्णय शक्तीचा विकास साधला जात असणे, तसेच आत्मविश्वास, सदाचार, धैर्य प्रामाणिकपणा, वक्तशीरपणा, दया, निहाय, तत्परता, निष्ठा, सहकार्य, बंधुभाव, आधार, भाव, सहानुभूती, परोपकारबुद्धी, संघभावना, खिलाडीवृत्ती, नेतृत्व, सेवावृत्ती सत्यप्रियता, शिस्त आदी वैयक्तिक व सामाजिक गुणांचा विकास शारीरिक शिक्षणाच्या माध्यमातून होत असणे, मात्र या सर्व गोष्टी कागदोपत्री असल्याच्या दिसून येत असणे, एकीकडे राज्य शासन राज्यात ऑलम्पिक ची पदके आणण्याची स्वप्ने पाहत असणे, आणि दुसऱ्या बाजूला विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने क्रीडांगणावर आणणारा क्रीडा शिक्षक शाळेमध्ये भरती केला जात नसणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना.” |
| (४०) | ५१३६ | १० | “राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळात पदक विजेत्या खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देणेबाबत राज्य शासनाचे धोरण असणे, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्रमांक खेआस- 2010/प्र.क्र.272/10/क्रीयुसे, दिनांक 09/10/2010 मधील तरतुदीनुसार खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्यात येणे, प्राविण्य प्राप्त खेळाडूंकडून मुख्यत्वे उपजिल्हाधिकारी, पोलीस उपनिरिक्षक, अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, विक्रीकर अधिकारी गट-अ या पदासाठी पसंती देण्यात येणे, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | खेळाडूंच्या थेट नियुक्तीच्या संदर्भात संबंधित विभागाकडून काही प्रश्न उपस्थित करण्यात आल्याने खेळाडूंच्या थेट नियुक्ती धोरणामध्ये सुधारणा करणेबाबत शासन स्तरावर विचार विनिमय चालू असणे, याबाबत तातडीने अंतिम निर्णय होऊन खेळाडूंच्या शासन सेवेतील थेट नियुक्तीसाठी निश्चित करावयाच्या सेवाशर्ती, सेवाप्रवेश नियमानुसार प्रशिक्षण, रजा, विभागीय परीक्षाबाबतचे धोरण तात्काळ निश्चित करण्यासाठी संबंधितांना आदेशित करणे, मध्य प्रदेश सरकारच्या विक्रम पुरस्काराच्या शर्तीवर शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडूंना शासन सेवेत नियुक्ती देणेबाबतचे धोरण देखील तातडीने ठरविण्याची आवश्यकता असणे, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत प्राविण्य प्राप्त करणाऱ्या खेळाडूंना शासन सेवेत 5 टक्के आरक्षण देण्याचे शासनाचे धोरण असणे, शासनाचे विविध विभाग, शासनाच्या मालकीच्या व नियंत्रणाखालील महामंडळात, स्थानिक प्राधिकरणात व विविध स्वरुपाच्या शासकीय सवलती प्राप्त केलेल्या संस्थांमध्ये खेळाडूंना राखीव असलेली 5 टक्के आरक्षणाची नोकरभरती तातडीने राबविण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना". |
| (४१) | ५१३९ | १० | "बालेवाडी क्रीडा संकुल, पुणे येथे ऑलिंपिक भवन बांधण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतलेला असणे, त्याकरिता निधीची तरतूद करून तो आयुक्तांच्या कार्यालयात वितरित केलेला असणे, तथापि यासंदर्भातील पुढील कोणतीही कार्यवाही सरकारने केली नसल्यामुळे राज्यातील क्रीडा जगतात राज्य शासनाबाबत निर्माण झालेली नाराजी, यासंदर्भात तातडीने ऑलिंपिक भवन उभारण्याकडे राज्य शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना." |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १५ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई